# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

## वार्षिक सर्वसाधारण सभा २०१०-२०११

### रविवार दि.२८/०८/२०११ सकाळी १०:३० वा.

### रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१.

## २०१०-२०११

-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८.

टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

-: संलग्न :-

**भारतीय ऑलिम्पिक संघ**

-: मान्यताप्राप्त :-

**महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद**

## **वार्षिक सर्वसाधारण सभा** २०१०-२०११

रविवार दि.२८/०८/२०११ सकाळी १०:३० वा.

रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१.

-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग,

शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८.

टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

स्पीड पोस्ट / रजि. ए. डी. / ई - मेलव्दारे

संदर्भ क्रमांक :- एम.ओ.ए./एजीएम/नोटीस/२०११ **दिनांक :-** २५ जुलै २०११

प्रति,

माननीय श्री.________________

______________________________

स.न.वि.वि.

**विषय :-** सन २०१० – २०११ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (नोटीस)

महोदय,

आपणांस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या सन २०१० – २०११ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/०८/२०११ रोजी सकाळी १०:३० वा. रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे - ४११००१ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला असोसिएशनचे अध्यक्ष माननीय नामदार श्री. शरदरावजी पवारसाहेब उपस्थित राहणार असून या सभेची कार्यक्रम पत्रिका सोबत जोडली आहे.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनला **संलग्न** एकविध खेळांच्या प्रत्येक राज्य संघटनेचे **दोन प्रतिनिधी** आणि **असोसिएटस** मेंबर म्हणून मान्यता असलेल्या एकविध खेळाच्या प्रत्येक राज्य संघटनेचा **एक प्रतिनिधी** या सभेस हजर राहू शकतात. या सर्वसाधारण सभेस हजर राहणा-या आपल्या दोन/एक प्रतिनिधींची नांवे संबंधीत राज्य संघटनेने अध्यक्ष / सचिव यांचे सहीने फॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com) व कुरीअरने महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८ या कार्यालयात दिनांक १४/०८/२०११ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावीत ही विनंती.

कळावे, धन्यवाद.

आपला

(बाळासाहेब लांडगे)
महासचिव

सोबत :-

१. सभेची विषयपत्रिका
२. सन २०१०-२०११ वर्षाचा जमा-खर्च व ताळेबंद.
३. सन २०१०-२०११ वर्षाचा महासचिवांचा अहवाल.
४. सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रक.
५. ३४वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा - २०११ (झारखंड) जमा-खर्च व ताळेबंद
६. ३४वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा - २०११ (झारखंड) पथक प्रमुखांचा अहवाल

प्रत माहितीसाठी :-

१. मा. नामदार श्री. शरदराव पवारसाहेब,
   अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन
२. मा. महासचिव, भारतीय ऑलिम्पिक संघ, नवी दिल्ली
३. मा. सहधर्मदाय आयुक्त, मुंबई

# वार्षिक सर्वसाधारण सभा २०१०-२०११
# -: विषयपत्रिका :-

१. बुधवार, दिनांक २९ ऑगष्ट २०१० रोजी रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१. येथे झालेल्या सन २००९-२०१० च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०१०-२०११ वर्षाचा जमा - खर्च व ताळेबंद वाचून त्यास मान्यता देणे.
३. सन २०१०-२०११ वर्षाचा महासचिवांचा अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.
४. सन २०११-२०१२ सालासाठी मा. लेखापाल यांची नियुक्ती करणे.
५. सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या घटनेमधील तरतुदीनुसार मा.कायदेसल्लागारांची नेमणूक करणे.
७. आशियाई, राष्ट्रकूल व झारखंड येथे झालेल्या ३४वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंचा महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने गौरव समारंभाचा कार्यक्रम ठरविणे.
८. मा.अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यकारीणीने संमत केलेल्या घटना दुरूस्तीवर निर्णय घेणे.
९. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे विषय.

आपला

(बाळासाहेब शं. लांडगे)
महासचिव

विषेश सुचना :-
१. वार्षिक सर्वसाधारण सभेस येताना प्रतिनिधींनी सोबत विषयपत्रिका, २०१०-२०११ जमाखर्च, ताळेबंद व महासचिवांचाअहवाल आणावा.
२. कृपया सभेच्या नियोजित वेळेपूर्वी किमान पंधरा मिनिटे अगोदर सभा ठिकाणी उपस्थित रहावे.
३. आयत्यावेळचे विषय मांडावयाचे असल्यास असे विषय लेखी स्वरूपात दिनांक १४ ऑगष्ट २०११ पूर्वी पोहचतील अशा बेताने फॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल(maharashtraolympic@gmail.com) व असोसिएशनच्या अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे ४११०१८ या कार्यालयात संबंधीत राज्य संघटनेचे अध्यक्ष किंवा सचिव यांचे सहीने पाठवावेत.
४. अध्यक्ष माननीय नामदार श्री. शरदराव पवारसाहेब यांच्या वेळेचा, उपस्थितीचा व मार्गदर्शनाचा लाभ क्रीडाक्षेत्राला जास्तीत जास्त होणाच्या दृष्टीने या सभेच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्याचा प्रयत्न असून आपले सहकार्य अपेक्षित आहे.
५. सर्व राज्य संघटनांनी त्यांची सन २०१०-२०११ ची संलग्नता फी दिनांक १४ ऑगष्ट २०११ पूर्वी भरण्याची व्यवस्था करावी.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

-: संलग्न :-

**भारतीय ऑलिम्पिक संघ**

-: मान्यताप्राप्त :-

**महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद**

**वार्षिक सर्वसाधारण सभा** २०१०-२०११

रविवार दि.२८/०८/२०११ सकाळी १०:३० वा.

रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१.

रविवार, दिनांक २९ ऑगष्ट २०१० रोजी

रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४१००१. येथे झालेल्या

## वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृतांत

-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग,

शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – १८.

टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

**महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२९/०८/२०१० रोजी सकाळी ११:०० वा. मा. अध्यक्ष ना. श्री. शरदरावजी पवार साहेब यांचे अध्यक्षतेखाली रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१. येथे संपन्न झाली या सभेमध्ये विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आले.**

मा. उपाध्यक्ष श्री. सुरेशभाई कलमाडी, मा. श्री. प्रफुल्ल पटेल, मा.श्री.सतिश प्रधान, मा.श्री. अशोक पंडीत तसेच सहसचिव मा. श्री. जय कवळी यांच्या वैयक्तिक कारणांमुळे सभेला उपस्थित राहू शकणार नाही असे लेखी कळविल्यामुळे त्यांची रजा मंजुर करण्यात आली.

**विषय क्रं. १ :- बुधवार, दिनांक २७ जानेवारी २०१० रोजी रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे –०१. येथे झालेल्या सन २००८-२००९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :-** बुधवार, दिनांक २७ जानेवारी २०१० रोजी रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१. येथे झालेल्या सन २००८ – २००९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृतांत वाचून दाखविण्यात आला व तो सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक :- ॲड. श्री. धनंजय भोसले
अनुमोदक :- मा. श्री. प्रदीप
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.२ :- सन २००९ - २०१० वर्षाचा जमा - खर्च व ताळेबंद वाचून त्यास मान्यता देणे.**

**ठराव :-** सन २००९ - २०१० वर्षाचा जमा - खर्च व ताळेबंद मा. श्री. चंद्रकांत शिरोळे, खजिनदार, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना यांनी वाचून दाखविला त्यास सभेने सर्वानुमते मान्यता दिली.

सुचक :- मा. श्री. बाळासाहेब लांडगे
अनुमोदक :- मा. श्री. धनंजय भोसले
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.३ :- सन २००९ - २०१० वर्षाचा महासचिवांचा अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.**

**ठराव :-** सन २००९ - २०१० वर्षाचा महासचिवांचा अहवाल मा. महासचिव श्री. बाळासाहेब लांडगे, यांनी सभेपुढे वाचून दाखविला व त्यास सभेने एकमताने मान्यता दिली.

सुचक :- मा. श्री. प्रल्हाद सावंत
अनुमोदक :- मा. श्री. प्रदीप गंधे
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.४ :- सन २०१० – २०११ सालासाठी मा. लेखापाल यांची नियुक्ती करणे.**

**ठराव :-** सन २०१० – २०११ या वर्षासाठी लेखापाल मे गडकरी ॲन्ड कंपनी यांची नेमणुक करण्यात आली त्यास सभेने सर्वानुमते मान्यता दिली.

सुचक :- मा. श्री. चंद्रकांत शिरोळे
अनुमोदक :- मा. श्री. बाळासाहेब लांडगे
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.५ :- सन २०१० - २०११ सालचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.**

**ठराव :-** कार्यकारीणीने मंजूर करून वार्षिक सर्वसाधारण सभेकडे केलेल्या शिफारशीनुसार तसेच संलग्न सर्व राज्य संघटना आणि असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व सदस्यांना वितरित केलेले दि. १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ या वर्षाचे अंदाजपत्रक वाचून दाखविण्यात आले चर्चेनंतर एकमताने मंजूर करण्यात आले.

सुचक :- मा. श्री. चंद्रकांत शिरोळे
अनुमोदक :- मा. श्री. प्रल्हाद सावंत
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.६ :- महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या घटनेमधील तरतुदीनुसार मा. कयदेसल्लगारांची नेमणूक करणे.**

**ठराव :-** कायदे सल्लागाराची नियुक्ती करणेसंबंधी कार्यकारी परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार आवश्यकता भासल्यास कायदे सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार कार्यकारी परिषदेस राहतील असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला .

सुचक :- मा. श्री. प्रल्हाद सावंत
अनुमोदक :- मा. श्री. प्रदिप गंधे
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.७ :- मा. अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यकारीणीने संमत केलेल्या घटना दुरूस्तीवर योग्य तो निर्णय घेणे.**

**ठराव :-** मा. महासचिवांनी सर्व सदस्यांना घटना दुरूस्ती पाठविल्याचे सांगितले त्यावर एका प्रतिनिधीने आपल्याला मिळाली नसल्याचे सांगितले तेंव्हा अध्यक्षांनी त्यावर स्वतंत्र सभा बोलवावी असे सांगितले .

सुचक :- मा. श्री. प्रकाश तुळपुळे
अनुमोदक :- मा. श्री. महेंद्र चेंबुरकर
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.८ :- ऑक्टोबर २०१० मध्ये दिल्ली येथे होणा-या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा व बॅटनरीले संबंधी माहिती घेणे.**

**ठराव :-** बॅटन रीलेचा मार्ग व त्याचे वेळापत्रक या संबंधी सविस्तर माहीती घेऊन सर्व संघटनांना कळवावी .

सुचक :- मा. श्री. रेखा भिडे
अनुमोदक :- मा. श्री. मोहन भावसार
"ठराव सर्वानुमते मंजूर"

**विषय क्रं.९ :- रांची येथे होणा-या राष्ट्रीय कीडा स्पर्धेत सहभागी होणा-या महाराष्ट्राच्या कीडापथकाची माहिती घेणे.**

**ठराव :-** झारखंड ऑलिम्पिक संघटनेच्या मा.सचिवांकडून स्पर्धेची माहीती घेऊन सर्व संघटनांना कळवावी.

सुचक :- मा. श्री . प्रल्हाद सावंत
अनुमोदक :- मा. श्री. धनंजय भोसले
"ठराव सर्वानुमते मंजूर"

उपस्थितांचे आभार महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव मा. बाळासाहेब लांडगे यांनी मानले व सभेचे कामकाज समाप्त झाले.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

-: संलग्न :-

**भारतीय ऑलिम्पिक संघ**

-: मान्यताप्राप्त :-

**महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद**

## <u>अहवाल</u>

## महासचिव प्रा. बाळासाहेब लांडगे

-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग,
शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८.
टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

# महासचिवांचा अहवाल

माननीय नामदार श्री. शरदचंद्रजी पवार साहेब महोदय आणि सन्माननीय सहकारी बंधू व भगिनींनो, सविनय सादर प्रणाम वि.वि.

मी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचा वार्षिक अहवाल आपल्या अवलोकनार्थ व मंजूरीसाठी सादर करीत आहे.

# सभासदत्व

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या घटना व नियमानुसार खाली नमूद केलेल्या राज्य क्रीडा संघटनांचे सभासदत्व अस्तित्वात आहे.

## ❖ संलग्न राज्य संघटनांची नावे

१. महाराष्ट्र ॲमॅच्युअर ॲक्वेटिक्स् असोसिएशन
२. महाराष्ट्र ॲमॅच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशन
३. महाराष्ट्र स्टेट आर्चरी असोसिएशन
४. महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन
५. महाराष्ट्र स्टेट बास्केटबॉल असोसिएशन
६. महाराष्ट्र ॲमॅच्युअर बॉक्सिंग असोसिएशन
७. महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशन
८. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन
९. महाराष्ट्र ॲमॅच्युअर जिम्नॅस्टिक असोसिएशन
१०. महाराष्ट्र स्टेट हॅण्डबॉल असोसिएशन
११. द हॉकी महाराष्ट्र
१२. महाराष्ट्र ज्युदो असोसिएशन
१३. महाराष्ट्र स्टेट कबड्डी असोसिएशन
१४. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन
१५. महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन
१६. महाराष्ट्र रायफल असोसिएशन
१७. महाराष्ट्र स्टेट रोईंग असोसिएशन
१८. महाराष्ट्र टेबल टेनिस असोसिएशन
१९. महाराष्ट्र ट्रायाथलॉन असोसिएशन
२०. तायक्वोंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र
२१. महाराष्ट्र स्टेट व्हॉलीबॉल असोसिएशन
२२. महाराष्ट्र स्टेट वेटलिफ्टींग असोसिएशन
२३. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद

## ❖ सहयोगी राज्य संघटनांची नावे

१. महाराष्ट्र असोसिएशन ऑफ कॅनोईंग व कयाकींग
२. महाराष्ट्र स्टेट फेन्सिंग असोसिएशन
३. स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र
४. महाराष्ट्र कराटे असोसिएशन
५. महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन
६. बृहन महाराष्ट्र योग परिषद
७. महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन
८. महाराष्ट्र स्टेट आटयापाटया असोसिएशन
९. महाराष्ट्र ॲमॅच्युअर मल्लखांब असोसिएशन
१0. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन

## ❖ मान्यता प्राप्त राज्य संघटनांची नावे

११. ऑल महाराष्ट्र वुशु असोसिएशन
१२. महाराष्ट्र सेपक टेकरॉ असोसिएशन
१३. महाराष्ट्र रस्सीखेच असोसिएशन
१४. महाराष्ट्र स्टेट रोल बॉल असोसिएशन
१५. महाराष्ट्र इक्वेस्ट्रीरीयन असोसिएशन
१६. महाराष्ट्र टेनिक्वाईट असोसिएशन

# वार्षिक सर्वसाधारण सभा महासचिवांचा अहवाल

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची सन २००९-२०१० ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२९/०८/२०१० सकाळी ११:०० वा. रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे – ४११००१. येथे संपन्न झाली. या सभेत घेण्यात आलेल्या महत्वाच्या निर्णयावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

# ऑलिम्पिक डे रन

भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या निर्देशानुसार दिनांक २३ ते २९ जून २०१० या कालावधित 'ऑलिम्पिक डे रन' सप्ताहनिमित्ताने विविध उपक्रमांचे मुंबई, नागपूर व पुणे येथे आयोजन करण्यात आले.

दि.२४ व २५ जून दरम्यान आंतरराष्ट्रीय स्पोर्टस् फोटोग्राफर श्री. मोहन बने यांच्या ऑलिम्पिक फोटोचे प्रदर्शन पुणे महानगरपालिका आर्ट गॅलरी घोले रोड येथे आयोजित करण्यात आले होते.

दि. २६ जून रोजी डोपिंगमुळे होणारे गंभिर परिणाम या विषयावर कै.बाबुराव सणस ग्राऊंड येथे पुणे जिल्हा स्तरिय ॲथलेटीक्स् स्पर्धेतील खेळाडूंना डॉ. आनंद गंगवाल, कर्नल नायर, डॉ. पराग संचेती यांनी मार्गदर्शन केले. तसेच २६ व २७ जून रोजी श्री. मामासाहेब क्रीडा संकुल, कात्रज, पुणे येथे जिल्हा स्तरीय सब ज्युनियर, ज्युनियर, सिनियर वुशू स्पर्धांचे आयोजन केले होते.

दि.२९जून रोजी बालेवाडी येथे ऑलिम्पिक डे रन तसेच ऑलिम्पिक वीर अर्जुन पुरस्कार या सन्माननीय व्यक्तींनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. ऑलिम्पियन श्री.बाळकृष्ण अकोटकर, श्री.हरिशचंद्र बिराजदार, श्रीमती रेखा भिडे, श्री. मनोज पिंगळे, श्री. अजित लकरा, श्री. रामोई जेम्स्, श्री. गुंडदिपकुमार अर्जुन पुरस्कार सन्मानित श्री. शांताराम जाधव इत्यादी मान्यवरांचा माननीय स्थायी समिती अध्यक्ष श्री. प्रशांत शितोळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा.नरेंद्र सोपल सहसंचालक – क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या शुभ हस्ते व माणिक ठोसरे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे मा.श्री. संजय सबनिस, सहाय्यक संचालक – क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे. मा.श्री. संदिप बलकवडे प्राचार्य क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरव करण्यात आला.

शालेय जीवनापासून ऑलिम्पिक खेळाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून ३० जून रोजी नागपूर येथील यशवंत स्टेडियम धंतोली येथे शालेय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थी नीसाठी राज्य पातळीवरील ऑलिम्पिक खेळ या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या ऑलिम्पिक सप्ताहाचा शेवट ३० जून रोजी राज्याच्या राजधानीत मुंबई येथे, मिनी थिएटर, ३रा मजला, पी.एल. देशपांडे कला ॲकॅडमी, रविंद्र नाटयमंदीर, सायनी रोड, प्रभादेवी, मुंबई येथे भारतीय ऑलिम्पिक महासंघाची स्वायतता व केंद्र सरकारचा हस्तक्षेप योग्य / अयोग्य या विषयावरील परीसंवादाने झाला. इंग्रजी, मराठी, हिंदी अशा तीन भाषेत क्रीडा संघटक क्रीडा पत्रकार व क्रीडा रसीक यांनी आपली मते मांडली. त्यामध्ये शिवसेनेचे माजी खासदार सतिश प्रधान, ॲथलेटीक्स महासंघाचे कार्याध्यक्ष अदिल सुमारीवाला, अर्जुन पुरस्कार विजेते अशोक पंडित, क्रीडा पत्रकार करमरकर व श्री. वली मोहमद आदिंचा समावेश होता.

३४ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २०११ रांची, जमशेदपूर, धनबाद (झारखंड) या ठिकाणी दि.१२ ते २६ फेब्रुवारी २०११ या कालावधीमध्ये पथक प्रमुख महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे खजिनदार मा.श्री. चंद्रकांत शिरोळे व उपपथक प्रमुख ॲड.श्री.धनंजय भोसले यांच्या नेतृत्वाखाली समन्वयक मा. श्री. सिताराम भोतमांगे, श्री. राज गुलाटी, श्री. सुमंत वाईकर, श्री. विकास मानकर, श्री.नामदेव शिरगावकर व इतर सहकारी यांनी वेगवेगळया खेळाचे खेळाडू व अधिकारी यांच्या संपर्कात राहून वेळोवेळी त्यांना सहकार्य केले व स्पर्धा यशस्वी करण्यांत मदत केली. या स्पर्धेमध्ये २९ राज्य क्रीडा संघटनांचे खेळाडू, संघटक, मार्गदर्शक, डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, मसाजर, तसेच कार्यालयिन स्टाफ असा मिळून ५४३ जणांचे पथक होते. या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्राने ४१ सुवर्ण, ४४ रौप्य, ४७ कांस्य अशी एकूण १३२ पदके मिळवून सेनादल वगळता भारतामध्ये सर्व राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. यामध्ये विशेषतः जलतरणमध्ये सर्वाधिक एकूण ४७ पदके, जिम्नॅस्टिक १४ व शूटींगमध्ये १४ पदके मिळवून महाराष्ट्राच्या नावलौकीक वाढविला. **विरधवल खाडे या जलतरण पटटूस सर्वोत्तम खेळाडू म्हणून मुख्यमंत्री मा.श्री.अर्जुन मुंडा यांचे हस्ते गौरविण्यात आले.**

यावेळी सर्व राज्य संघटनेच्या पदाधिका-यांनी आपापली जबाबदारी उत्तमरित्या पार पाडल्यामुळे हे नेत्रदिपक यश मिळाले.

# आभार

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सन्माननीय अध्यक्ष माननीय नामदार श्री. शरदराव पवार साहेब, भारतीय ऑलिम्पिक संघाचे अध्यक्ष मा.खा.श्री. सुरेश कलमाडी व असोसिएशनचे सन्माननीय उपाध्यक्ष सर्व सन्माननीय पदाधिकारी एकविध खेळाच्या संलग्न सर्व राज्य संघटना आपण सर्व व सहकारी मित्रांनी दिलेल्या सहकार्यामुळेच मला काम करणे शक्य होत आहे असे मी मानतो त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून महाराष्ट्राला कीडाक्षेत्रात देशात अव्वल स्थान प्राप्त करून देण्याचे माननीय नामदार श्री. शरदराव पवार साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या सहकार्याने मनापासून प्रयत्न करण्यास मी कटीबध्द आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रांची येथील ३४व्या राष्ट्रीय कीडा स्पर्धेत मिळालेले नेत्रदिपक यश होय. महाराष्ट्राचे कीडा हित विचारात घेवून आपण केलेल्या सूचनांचे मी आणि माझे सर्व सहकारी सदैव स्वागतच करतील महाराष्ट्राच्या कीडा विकासासाठी व कीडा हित जोपासण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. संघटीत झाल्यानंतरच आपले प्रश्न सुटू शकतात.

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेला राज्याचे मुख्यमंत्री - मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री – मा.ना.श्री. अजितदादा पवार, कीडामंत्री – मा.ना.डॉ.श्री.पद्माकर वळवी, कीडाराज्यमंत्री – मा.ना.श्री. भास्करराव जाधव यांनी तसेच मा.श्री.नरेंद्र सोपल, संचालक - कीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.माणिक ठोसरे, उपसंचालक - कीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, व त्यांच्या सर्व सहका-यांनी व वित्त खात्यातील अधिकारी यांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले आहे व करीत आहेत. त्याबद्दल महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने आभार मानतो.

धन्यवाद,

(बाळासाहेब लांडगे)
महासचिव
महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

-: संलग्न :-

**भारतीय ऑलिम्पिक संघ**

-: मान्यताप्राप्त :-

**महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद**

दिनांक १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ या कालावधिचा

## लेखापरिक्षकांचा अहवाल व लेखाविवरणपत्रक


-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग,

शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८.

टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

-: संलग्न :-

**भारतीय ऑलिम्पिक संघ**

-: मान्यताप्राप्त :-

**महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद**

दिनांक १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या सालचे

## अंदाजपत्रक


-: नोंदणीकृत कार्यालय :-

व्दारा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पॅव्हेलियन, वीर सावरकर मार्ग,

शिवाजी पार्क दादर (पश्चिम) मुंबई ४०००२८

-: सचिवालय :-

अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८.

टेलीफॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com)

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

संलग्न : भारतीय ऑलिम्पिक महासंघ ● महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त

नोंदणी क्रमांक : Bom / 314 / 80; F - 6162 / Bom.

नोंदणीकृत कार्यालय :
महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, वीर सावरकर मार्ग,
शिवाजी पार्क, दादर (प), मुंबई - ४०० ०२८

सचिवालय : अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर,
पिंपरी, पुणे - १८. टेलिफॅक्स : (०२०) २७४३१८३५
ई-मेल : maharashtraolympic@gmail.com

अध्यक्ष
मा. ना. शरदराव पवार
मंत्री, कृषी व अन्न पुरवठा,
भारत सरकार

महासचिव
मा. बाळासाहेब लांडगे
मोबा.: ९४२२३१०४५४


स्पीड पोस्ट / रजि. ए. डी. / ई - मेलव्दारे

संदर्भ क्रमांक :- एम.ओ.ए./स्पे.एजीएम/नोटीस/२०११ **दिनांक :-** १ ऑगष्ट २०११

प्रति,

माननीय श्री.____________________

______________________________

स़.न.वि.वि.

**विषय :-** विशेष सर्वसाधारण सभेची सूचना (नोटीस)

महोदय,

आपणांस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/०८/२०११ रोजी सकाळी ११:३० वा. रॉयल कॅनॉट बोट क्लब, पुणे - ४११००१ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला असोसिएशनचे अध्यक्ष माननीय नामदार श्री. शरदरावजी पवारसाहेब उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनला **संलग्न** एकविध खेळांच्या प्रत्येक राज्य संघटनेचे **दोन प्रतिनिधी** आणि **असोसिएटस** मेंबर म्हणून मान्यता असलेल्या एकविध खेळाच्या प्रत्येक राज्य संघटनेचा **एक प्रतिनिधी** या सभेस हजर राहू शकतात. या सर्वसाधारण सभेस हजर राहणा-या आपल्या दोन / एक प्रतिनिधींची नांवे संबंधीत राज्य संघटनेने अध्यक्ष / सचिव यांचे सहीने फॅक्स (०२०-२७४३१८३५) ई-मेल (maharashtraolympic@gmail.com) व कुरीअरने महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८ या कार्यालयात दिनांक १४/०८/२०११ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावीत ही विनंती.

कळावे.

## -: विषयपत्रिका :-

१. मा.अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यकारीणीने संमत केलेल्या घटना दुरूस्तीवर निर्णय घेणे.
(दुरूस्त केलेली घटना सर्व राज्य संघटनांना वर्षभर अगोदर पाठविण्यात आली आहे.)

आपला

(बाळासाहेब शं. लांडगे)
महासचिव